आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ जुलै २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दौऱ्यावर रवाना

- सहकार क्षेत्राला एक शतक पुढे नेण्याचं कार्य सहकार मंत्रालयाच्या स्थापनेमुळे शक्य झाल्याचं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्र्यांचं प्रतिपादन

- देशाच्या विविध भागात दमदार पाऊस/ महाराष्ट्रात राजधानी मुंबईसह अनेक ठिकाणी जनजीवन प्रभावित

आणि

- विम्बल्डन टेनिस महिला एकेरीत नाओमी ओसाका कडून अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला पराभवाचा धक्का

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून सहा दिवसांच्या परदेश दौऱ्यावर रवाना झाले. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यांच्या निमंत्रणावरून आपण इंडोनेशियाला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी प्रस्थानापूर्वी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. या भेटीमुळे सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या दौऱ्यात ते तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधणार असून प्रोबोवो यांच्यासोबत योग्यकार्ता इथल्या प्रंबनन मंदिर संकुलाला भेट देणार आहेत.

नंतर प्रधानमंत्री, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्या निमंत्रणावरून मेलबर्न इथे रवाना होतील. ऑस्ट्रेलियातही ते भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत. यानंतर प्रधानमंत्री न्यूझीलंडला भेट देतील आणि आर्थिक आणि व्यापारी संबंधांवर न्यूझीलंडच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा करतील.

**<><><><><>**

देशात गेल्या ७५ वर्षांत सहकार क्षेत्रात होणारी आंदोलनं ही नेहमी दुर्लक्षित होती. मात्र, सहकार क्षेत्राला एक शतक पुढे नेण्याचं कार्य सहकार मंत्रालयाच्या स्थापनेमुळे शक्य झाल्याचं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा म्हणाले. सहकार मंत्रालयाच्या पाचव्या स्थापना

दिनानिमित्ताने आज त्यांच्या हस्ते देशभरातल्या अनेक महत्त्वाच्या सहकार उपक्रमांची पायाभरणी आणि उद्घाटन झालं त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या सहकार क्षेत्रात झालेल्या कामाविषयी शहा म्हणाले...

**होल्ड.. बाईट - अमित शहा**

या कार्यक्रमात देशभरातल्या २३२ धान्य साठवण गोदामांचं उद्घाटन, सहकार वन तसंच, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यांतील उती संवर्धन सुविधांचं भूमीपूजन शहा यांनी केलं. राष्ट्रीय सहकार डेटाबेस आणि जिओ-टॅग मोबाइल ॲप्लिकेशन तसंच राष्ट्रीय डेअरी विकास परिषदेच्या दूधपुरवठ्याशी संबंधित मिल्क सप्लाय रिव्ह्यू डॅशबोर्ड पोर्टलचं लोकार्पण शहा यांच्या हस्ते झालं. त्याशिवाय सहकार सीबीएस आणि सहकार सहयोगी या दोन प्रमुख उपक्रमांचा प्रारंभ शहा यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमादरम्यान ५० हजार प्राथमिक कृषी पतसंस्थांचं इ-पॅक्समध्ये रूपांतर करण्यात आलं. त्याचबरोबर, बियाणे प्रणाली बळकट करण्यासाठी भारतीय बीज सहकारी समिती आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेदरम्यान सामंजस्य करारही करण्यात आला.

<><><><><>

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज उपराष्ट्रपती भवनात डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. डॉ. मुखर्जी हे हे प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, द्रष्टे राजकारणी आणि राष्ट्रनिर्माते होते. त्यांनी भारताच्या शैक्षणिक, राजकीय आणि लोकशाही प्रवासावर अमिट छाप सोडल्याचं उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही डॉ. मुखर्जी यांना अभिवादन केलं आहे. विद्वत्ता, धैर्य आणि राष्ट्र सेवा या गुणांच्या बळावर डॉ. मुखर्जी यांनी आपलं जीवन राष्ट्रनिर्मितीसाठी समर्पित केलं. भारताचं ऐक्य, स्वाभिमान आणि प्रगतीसाठी ते सदैव कार्यरत राहिले. विकसित भारताच्या प्रवासात डॉ. मुखर्जी यांचे विचार आजही मार्गदर्शक असल्याचं प्रधानमंत्री मोदी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनीही डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांना अभिवादन केलं आहे.

<><><><><>

देशभरातल्या ९३ कोटींपेक्षा जास्त आभा अर्थात आयुष्मान भारत आरोग्य खात्यांशी १०४ कोटींपेक्षा जास्त आरोग्य नोंदी जोडल्या गेल्याचं केंद्र सरकारने म्हटलं आहे. आभा क्रमांक हा आधार कार्डाच्या क्रमांकाप्रमाणेच एक १४ अंकी क्रमांक असून त्यामुळे रुग्णांना डिजिटल आरोग्य सेवांचा लाभ घेणं शक्य होतं. या प्रणालीच्या माध्यमातून रुग्ण आपली संपूर्ण वैद्यकीय माहिती सुरक्षित ठेवून विमा कंपन्या, आरोग्य सुविधा केंद्र, डॉक्टर आणि इतर संबंधित सेवांशी जोडले जाऊ शकतात, असं सरकारने म्हटलं आहे. देशातले सर्व रुग्ण आणि आरोग्य सुविधा केंद्रांचा समावेश करून आयुष्मान भारत डिजिटल मिशनचं जाळं विस्तारण्याचं आणि प्रत्येक नागरिकासाठी पूर्णपणे डिजिटल आरोग्य नोंदी उपलब्ध करून देण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात आज मोसमी पावसानं दमदार हजेरी लावली असून अनेक ठिकाणी जनजीवन प्रभावित झालं आहे.

महाराष्ट्रात राजधानी मुंबई सह अनेक ठिकाणी पाऊस होत आहे. अधिक माहिती देत आहेत आमच्या प्रतिनिधी अंकिता आपटे...

**- - - होल्ड - VC -- -**

*(मुंबई शहर आणि उपनगर परिसरात गेले तीन दिवस पडणाऱ्या संततधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई ते पुणे रस्ता आणि रेल्वे वाहतूक अतिशय संथगतीनं होत आहे. घाटातल्या मिसिंग लिंकवर तसंच रेल्वे मार्गावर मंकी हिल इथं मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळून रस्ते आणि रुळांवर राडारोडा जमला आहे. मुंबई - ते पुणे धावणाऱ्या अनेक गाड्या आज रद्द झाल्या असून लांबपल्ल्याच्या अनेक गाडंयाचे मार्ग आणि वेळा बदलण्यात आल्या आहेत. जुना मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद केला असून या मार्गावरची एसटी गाड्यांची वाहतूक पुढची सूचना मिळेपर्यंत बंद राहील. पश्चिम रेल्वेच्या वसई विरार आणि नालासोपारा स्थानकांवर पाणी साचल्यानं उपनगरी वाहतूक ठप्प झाली आहे.*
*मुंबई गोवा मार्गावरही काही ठिकाणी दरडी कोसळल्यानं वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. मुंबई शहरात अनेक सखल भागात पाणी साचलं असून काही ठिकाणी घरं आणि दुकानांमधे पाणी शिरलं आहे.*

*मानखुर्द इथं अर्धवट बांधलेली इमारत कोसळून त्याखाली ६ जणांचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.*

*मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचे वारे या स्थितीत आवश्यकता नसेल तर प्रवास करु नये, घराबाहेर पडू नये असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.)*

राज्यात किनारपट्टीच्या सर्व जिल्ह्यांना तसंच पुणे घाटमाथा परिसराला हवामानविभागानं दोन दिवसांसाठी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. या पार्श्वभूमीवर या ठिकाणच्या शाळा महाविद्यालयांना आज सुट्टी दिली आहे. राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यात पावसामुळं झालेल्या दुर्घटनांमधे गेल्या तीन- चार दिवसात १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री गिरीश महाजन यांनी विधान परिषदेत दिली.

मुसळधार पावसामुळे दृष्यमानता कमी झाल्याने विमानवाहतुकीवरही परिणाम झाला आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजीमहाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरची धावपट्टी आज सकाळी सुमारे तासभर बंद ठेवावी लागली.

**<><><><><>**

मध्य प्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश, केरळ आणि पश्चिम बंगालमधेही जोरदार पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवन प्रभावित झालं आहे.

गुजरात, कोकण, गोवा, मध्यमहाराष्ट्र, आणि छत्तीसगढमधे आज अतिशय जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पूर्व राजस्थान, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, उत्तराखंड, आसाम, मेघालय, बिहार, पूर्व उत्तरप्रदेश, हरियाणा, चंडीगढ दिल्ली आणि पश्चिम बंगाल इथं जोरदार ते मध्यम पाऊस पडेल असा अंदाज आहे.

**<><><><><>**

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या महिला एकेरीत नाओमी ओसाका हिनं अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला पराभवाचा धक्का दिला. नाओमीनं अरीनावर 6-2, 7-6 अशा थेट सेट्समध्ये मात करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. याशिवाय, कोको गॉफ, जेसिका पेगुला आणि कॅरोलिना मुकोवा यांनीही उपांत्यपूर्व फेरी गाठली. पुरूष एकेरीत नोवाक जोकोविचने रोमान सॅफिउलीन याच्यावर 7-6, 6-3, 3-6, 6-3 अशी मात करून उपांत्यपूर्व

फेरीतलं स्थान निश्चित केलं. या विजयासोबतच विम्बल्डनच्या मैदानावर सर्वाधिक, 106 सामने जिंकणारा पुरुष टेनिसपटू हा विक्रम त्याने आपल्या नावावर केला. अग्रमानांकित यानिक सिनरनं शिंतारो मोचीझुकी याच्यावर सहज विजय मिळवला. तर फीलिक्स ऑजर अलियासीम यानं अलेजांद्रो डेव्हिडोविच फोकीना याला ५ सेट्सच्या थरारक सामन्यात हरवून पुढच्या फेरीत प्रवेश केला.

//<><><><><>//